# महाराष्ट्र शासन

## अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

**पत्रव्यवहाराचा पत्ता :- प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०१ १०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.**

**दुरध्वाी क्र. ०२२-२८१८५९१६** **ईमेल आयडी-**tahmirabhayander@gmail.com

क्र.महसुल/ कांदळवन/कावि-१९६/२०२० दिनांक :२७/०१/२०२०

107

प्रति,
मा.उप वरनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई

विषय : जिल्हा ठाणे भाईंदर पश्चिमेच्या उत्तन रोड, जय बामन देव नगर, मर्धा खाडीजवळील नाल्या शेजारी रामवृक्ष चौधरी नामक भु माफियाव्दारे अवैध्य रित्या कांदळवनाची तोड करुन (एका खोलीचे) बांधकाम केल्याबाबत

संदर्भ : कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे अर्जदार हिंद सागर यांनी दाखल केलेली तक्रार अ.क्र.१०७

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे हिंद सागर यांनी दाखल केलेली तक्रार या कार्यालयास ई-मेलव्दारे प्राप्त झालेली आहे. (तक्रार अ.क्र.१०७ )

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने मा.अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीने वनविभाग, पोलीस निरीक्षक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, मिरा भाईंदर महानगरपालिका व तक्रारदार यांचेसोबत स्थळपहाणी करुन त्याबाबचा अहवाल देण्याबाबत निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने दि.०३/०१/२०२० रोजी स्थळपहाणी निश्चित करणेत आली.

त्यानुसार स्थळपाहणी दरम्यान या कार्यालयाकडील नायब तहसिलदार, पोलीस अधिकारी-कर्मचारी, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी, मंडळ अधिकारी भाईंदर व संबधित तलाठी यांनी अर्जदार यांचे समवेत विषयांकित जागेची दि.०३/०१/२०२० रोजी स्थळपहाणी केली असुन मंडळ अधिकारी भाईंदर यांनी त्यांचेकडील पत्र जा.बा.नि.क्र.१२८/२०१९-२० दि.०३/०१/२०२० अन्वये खालील प्रमाणे एकत्रित स्थळपहाणी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

स्थळपाहणी दरम्यान मुर्धा ब्रिजच्या अलिकडील उजव्या बाजुस जाणारा कच्चा रस्त्याच्या पुढे अंदाजे १ ते २ कि.मी. अंतरावर डाव्या बाजुला एक पत्रा शेड घराचे काम केलेले आहे. तसेच या ठिकाणी डेब्रीज भराव अंदाजे १०० चौ.फुट असुन सदर कच्चे घर राजेश कोळी यांचे आहे. सदर घर अनाधिकृत असुन वामन नगर या वस्तीच्या शेवटच्या भागात अनाधिकृत खोल्याचे बांधकाम झालेले असुन श्री.रामरुक्ष चौधरी यांनी अनाधिकृत केलेले बांधकाम मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि.२१/०२/२०१९ रोजी निष्कासित केले बाबत अहवाल क्र.४१९३/२०१९-२० दि.२१/०२/२०१९ अन्वये कळविले आहे. सदर ठिकाणी आज रोजी कांदळवनाची तोड झालेली दिसुन येत नाही. सदर स.नं.नविन १११ या सरकारी जमिनीवर या व्यतिरिक्त अनेक खोल्याचे बांधकाम झालेले आहेत. सदर बांधकामे निष्कासित करण्यासाठी महानगरपालिका अतिक्रमण विभागाकडुन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सदर तक्रारीबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.महसूल/कांदळवन/कावि-१९६/२०२० दि.२२/०१/२०२० अन्वये प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष स्थळपाहणी व अर्जदार यांचे मागणीनुसार नमुद ठिकाणी प्रस्तुत बांधकाम पूर्णपणे तोडणेबाबतची कारवाई तात्काळ करणेबाबत कळविले आहे.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 287
दिनांक 4/3/2020
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

तरी प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचे निर्देशानुसार वरीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करीत आहोत. सोबत उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी, Geo Tagging सह फोटो व मंडळ अधिकारी भाईंदर यांचेकडील मूळ अहवाल सादर केलेला आहे.

**(डॉ. नंदकिशोर देशमुख)**
**अपर तहसीलदार मिरा-भाईंदर**

प्रत : मा.जिल्हाधिकारी ठाणे (महसूल शाखा) यांजकडे माहितीस्तव सविनय सादर